महाराष्ट्राचे निडर दैनिक

# शौर्य मराठी

RNI-MAHMAR/2023/89125

epaper.shauryamarathi.com

जळगाव, धुळे, नंदुरबार | शनिवार . दि. ४ एप्रिल २०२६ | वर्ष २ रे | अंक १४३ किंमत : ५ रु. | पाने ४

## दिन विशेष...

१९४९ : पश्चिम युरोपातील राष्ट्रे व अमेरिका यांच्यात संरक्षणविषयक उत्तर अटलांटिक करार म्हणजे नाटो करार करण्यात आला.

१९६८ : नासा ने अपोलो -६ चे प्रक्षेपण केले.

१९६८ : मार्टिन ल्यूथर किंग (ज्यू) यांची हत्या झाली.

१९६८ : अमेरिकेतील गांधीवादी निग्रो नेते मार्टिन ल्यूथर किंग यांचा मृत्यू.

| | | |
|---|---|---|
| सेन्सेक्स | ७३,३१९.५५ | +१८५.२३ (०.२५%) |
| डॉलर | ₹ ९२.६३ | |

**आजचे तापमान** (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३६ | २३ |
| दिल्ली | ३३ | २० |
| मुंबई | ३३ | २४ |
| नागपूर | ३७ | २३ |
| पुणे | ३३ | १७ |

## सुविचार

आयुष्यातील प्रत्येक दिवस हा एक नवीन सुरुवात आहे; कालच्या चुका आणि अपयशांपासून काहीतरी नवीन शिकून, आजचा दिवस उत्साहाने साजरा करा.

| सूर्योदय | सूर्यास्त |
|---|---|
| स.-६:१९ | संध्या-६:४३ |

**सोने - चांदी**

| सोने (१० ग्रॅम) | चांदी (प्रति किलो) |
|---|---|
| १,५१,२०५/- | २,५०,०००/- |

# रशियाने दिले भारताला तेल, नैसर्गिक वायूचा पुरवठा वाढवण्याचे आश्वासन

## ...अखेर भारताचा मित्रच मदतीला धावला; अमेरिकेचा जळफळाट वाढणार

वृत्तसंस्था । मॉस्को

पश्चिम आशियातील तणाव आणि होर्मुझ सामुद्रधुनीतील अडथळ्यांच्या पार्श्वभूमीवर भारताच्या ऊर्जा धोरणात गेल्या एका महिन्यात मोठा बदल दिसून आला आहे. मार्च महिन्यात रशियाकडून होणारी तेलाची आयात ९०% वाढली, तर एकूण आयात कमी झाली असून गॅस पुरवठ्यावरील दबावामुळे भारताला नवीन स्त्रोत शोधण्यास भाग पडले आहे.



### भारतावरील होर्मुझ संकट कमी होण्याचे संकेत

अमेरिका आणि इस्त्रायलविरुद्ध इराणने पुकारलेल्या युद्ध आणि परिणामी होर्मुझ सामुद्रधुनीवर पहारा वाढवल्यामुळे निर्माण झालेल्या ऊर्जा संकटाच्या पार्श्वभूमीवर भारताला रशियाकडून आनंदवार्ता मिळाली आहे.भारताचे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर आणि रशियाच्या उप-पंतप्रधानांमध्ये एक महत्त्वाची बैठक झाली ज्यामध्ये रशियाने भारताला तेल आणि नैसर्गिक वायूचा पुरवठा वाढवण्याच्या आपल्या तयारीचे आश्वासन दिले.

टीओआयच्या अहवालानुसार, डिसेंबर २०२५ ते फेब्रुवारी २०२६ दरम्यान तुलनेने कमी खरेदी झाल्यानंतर रशियाकडून होणाऱ्या कच्च्या तेलाच्या आयात वाढली आहे. होर्मुझ सामुद्रधुनीतील अडथळ्यामुळे भारताच्या एलपीजी (स्वयंपाकाचा गॅस) आयातीत तब्बल ४०% घट झाली असून एलएनजीचा पुरवठाही कमी झाला होता.

काही महिन्यांपूर्वी रशियन तेलावर निर्बंध लादलणाऱ्या डोनाल्ड ट्रम्प यांनी जगासमोर ऊर्जा संकट उभं राहताच आपला निर्णय फिरवला आणि भारतासह इतर देशांना रशियन तेल खरेदी करायला हिरवा कंदील दाखवला ज्यामुळे युक्रेनमधील युद्धाला ब्रेक लावल्याचं त्यांचं स्वप्न धूसर होताना दिसत आहे.

द्विपक्षीय बैठकांनंतर जारी करण्यात आलेल्या संयुक्त निवेदनात, रशिया आणि भारताने ऊर्जा व व्यापार यांसारख्या अनेक महत्त्वाच्या क्षेत्रांमधील संबंध अधिक दृढ करण्यावर चर्चा केली. दोन्ही देशांनी तेल आणि वायू क्षेत्रातील सहकार्यामध्ये नवीन संधी निर्माण करण्यावर भर दिला; विशेषतः, भारताच्या वाढत्या ऊर्जेच्या गरजा पूर्ण करण्यासाठी (पान २ वर)

# राहुरी पोटनिवडणुकीत उमेदवारीवरून काँग्रेस-ठाकरे गटात वादंगाची चिन्हे





वृत्तसंस्था । अहिल्यानगर

**राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीतील उमेदवारीवरून आता महाविकास आघाडीतील काँग्रेस व शिवसेनेच्या ठाकरे गटात वादंगाची चिन्हे निर्माण झाली आहेत. उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी सोमवारी (दि. ६) अंतिम दिवस असतानाच ही चिन्हे दिसू लागली आहेत. काँग्रेसचे माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी राहुरी पोटनिवडणुकीत काँग्रेस उमेदवार देईल असे स्पष्ट केले तर ठाकरे गटाचे जिल्हा संघटक रावसाहेब खेवरे यांनी कोणत्याही परिस्थितीत आपण उमेदवारी करणार असल्याचे सांगत याची पूर्वकल्पना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना दिल्याचे स्पष्ट केले.**

विशेष म्हणजे रावसाहेब खेवरे यांनी काँग्रेसचे माजी मंत्री थोरात यांची आज, शुक्रवारी अहिल्यानगरमध्ये भेट घेऊन आपण उमेदवारी करणार असल्याची माहितीही दिली आहे. त्यावर थोरात यांनी आपण यासंदर्भात उद्धव ठाकरे यांच्याशी चर्चा करू असेही स्पष्ट केले. राहुरी पोटनिवडणुकीसाठी भाजपने यापूर्वीच दिवंगत माजी आमदार शिवाजी कर्डिले यांचे चिरंजीव अक्षय कर्डिले यांची उमेदवारी जाहीर केली आहे. राहुरीच्या गेल्या सार्वत्रिक (पान २ वर)

**राहुरी पोटनिवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत सोमवारची आहे. मात्र महाविकास आघाडीचा उमेदवार ठरवण्यावरून शेवटच्या टप्प्यात वादंग निर्माण होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांकडून मिळालेल्या माहितीनुसार शरद पवार गटाने काँग्रेसला वरिष्ठ पातळीवर राहुरी पोटनिवडणुकीत उमेदवार देणार नसल्याचे कळवले आहे. त्यामुळे आता शेवटच्या क्षणी काँग्रेस आणि ठाकरे गटातही उमेदवार शोधण्यासाठी धावपळ उडालेली आहे.**

## थोडक्यात



### उद्योगपती ओमप्रकाश रांका यांचे निधन

**पुणे ।** सुप्रसिद्ध उद्योगपती, रांका ज्वेलर्सचे संचालक आणि दानशूर व्यक्तीमत्व ओमप्रकाश नगराज रांका (वय ७१) यांचे गुरुवारी संध्याकाळी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर शुक्रवारी सकाळी ११ वाजता वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार केले जाणार आहेत. ओमप्रकाश रांका यांचे पार्थिव शुक्रवारी सकाळी मुकुंदनगर येथील निवासस्थानावरुन निघेल. प्रकृती अस्वास्थ्यामुळे रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र उपचार सुरु असतानाच त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पश्चात मुलगा वास्तुपाल आणि दोन मुली, नातवंडे यांच्यासह मोठा परिवार आहे.

### आधारकार्डअभावी अंत्यविधी १४ तास रखडला

**पुणे ।** डिजिटल इंडियाच्या गप्पा मारणाऱ्या या युगात पुणे शहरासारख्या स्मार्ट सिटीमध्ये आधारकार्ड नसल्याने एका व्यक्तीचा अंत्यविधी अनेक तास रखडल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. खडकवासला परिसरातील कातकरी समाजातील ५५ वर्षीय दत्ता बबन जाधव यांचा मृतदेह १४ तासांहून अधिक काळ अंत्यसंस्कारांअभावी पडून राहिला. आधारकार्डासारख्या मूलभूत कागदपत्राचा अभाव आणि सरकारी यंत्रणेची उदासीनता यामुळे ही परिस्थिती उद्भवल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.



### गारपीटसह वादळी पावसाचा इशारा

**मुंबई ।** अवकाळी पावसाने सगळ्यांचीच चिंता वाढवली आहे. गेल्या काही दिवसांपासून मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यामध्ये पावसाने हजेरी लावली आहे. अशातच पुढील काही दिवस हा पाऊस राज्यात मुक्कामी असेल असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. पुढील २४ तासांमध्ये उत्तर मध्य महाराष्ट्र, दक्षिण मध्य महाराष्ट्रात तसेच विदर्भ आणि मराठवाड्यातही पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

# इराणने अमेझॉनच्या डेटा सेंटर्सवर केला ड्रोनहल्ला

वृत्तसंस्था । तेहरान

**पश्चिम आशियात सुरू असलेल्या युद्धाने आता वेगळे वळण घेतले आहे. यूएई, बहारिन मधील टेक कंपन्यांच्या डेटा सेंटर्सवर इराणकडून हल्ले केले जात आहेत.**

अमेरिकन लष्कर एआय व डेटा सेंटर्सचा वापर करून युद्धात इराणवर कुठे व कधी हल्ला करायचा याबाबतचे निर्णय घेत असल्याचा संशय इराणला आहे. तसेच अमेरिकेकडून होत असलेल्या हल्ल्यांचा वेग डेटा सेंटर्स व एआयमुळे वाढल्याचा संशय इराणच्या लष्करी नेतृत्वाला आहे. त्यामुळे इराणने अमेरिकन कंपन्यांवर हल्ला करण्याचा इशारा ३१ मार्च रोजी दिला होता. त्यानंतर सलग दोन दिवस इराणकडून डेटा सेंटर्सवर हल्ले करण्यात आले.

इराणने बहारिनमधल्या अमेझॉनच्या डेटा सेंटरवर ड्रोनहल्ला का केला? युद्ध कुठल्या दिशेने चाललंय? युद्धात एआय व डेटा सेंटरचा वापर होत आहे का? सविस्तर जाणून घेऊयात.



**डेटा सेंटर्सला कसे लक्ष्य केले जात आहे?**

२८ फेब्रुवारी रोजी अमेरिका व इस्त्रायलने इराणवर पहिला हल्ला केल्यानंतर पश्चिम आशियात युद्ध सुरू झाले. या हल्ल्याच्या दुसऱ्याच दिवशी म्हणजे १ मार्च रोजी इराणने शाहेद ड्रोन्सने यूएईमधील अमेझॉन कंपनीच्या (पान २ वर)

## सोन्याच्या दरात घसरण

वृत्तसंस्था । दिल्ली

गुडरिटर्न्सच्या आकडेवारीनुसार, आज २४-कॅरेट सोन्याचा प्रति ग्रॅम दर १४ हजार ८९७ आहे, जो आदल्या दिवसाच्या १५,२९५ या दरापेक्षा ३९८ ने लक्षणीयरीत्या कमी आहे. त्याचप्रमाणे, ८ ग्रॅम २४-कॅरेट सोन्याचा दर १,१९,१७६ आहे.

जो आदल्या दिवसाच्या १,२२,३६० या दरापेक्षा ३,१८४ ने कमी आहे. आज, १० ग्रॅम २४-कॅरेट सोन्याचा भाव १,४८,९७० आहे. तो त्याच्या आधीच्या १,५२,९५० या भावापेक्षा ३,९८० ने कमी आहे. घाऊक खरेदीदारांसाठी, १०० ग्रॅम २४-कॅरेट सोन्याचा भाव आता १४,८९,७०० झाला आहे.

# महसूल, प्रवासी सेवा अन् माल वाहतुकीत मध्य रेल्वेचा भुसावळ विभाग अव्वल !

प्रतिनिधी । जळगाव

**मध्य रेल्वेच्या भुसावळ विभागाने आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये सर्वच आघाड्यांवर उल्लेखनीय कामगिरी करत आपली कार्यक्षमता सिद्ध केली आहे. महसूल वाढीसह प्रवासी सेवांतील सुधारणा, माल वाहतुकीतील वाढ आणि सुरक्षेच्या उपाय योजनांमुळे विभागाने एक नवा मानदंड निर्माण केला आहे. गतवर्षीच्या तुलनेत महसूलात ६.६२ टक्क्यांची वाढ नोंदवत १,७३६ कोटी रुपयांचा विक्रमी टप्पा गाठला आहे.**

भुसावळचे विभागीय व्यवस्थापक पुनीत अग्रवाल यांनी पत्रकार परिषदेत सविस्तर माहिती




देताना सांगितले की, विभागाची ही कामगिरी केवळ आर्थिक वाढ दर्शवत नाही, तर नियोजनबद्ध व्यवस्थापन, तंत्रज्ञानाचा वापर आणि सेवा गुणवत्तेतील सातत्यपूर्ण सुधारणा यांचा एकत्रित परिणाम आहे. तत्पूर्वी मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक प्रतिक गोस्वामी यांनी ऑनलाइन संवादातून विभागाच्या कामगिरीचे कौतुक केले. प्रवासी सेवांच्या क्षेत्रातही भुसावळ विभागाने लक्षणीय प्रगती साधली आहे. प्रवासी महसूल ९३८.०९ कोटी रुपयांपर्यंत पोहोचला असून, तो निर्धारित लक्ष्याच्या तुलनेत १.७८ टक्क्यांनी अधिक आहे. याशिवाय प्रवासी संख्येतही वाढ होऊन ४६८ लाख प्रवाशांनी रेल्वे सेवांचा वापर केला आहे. स्थानकांवरील स्वच्छता, तिकीट व्यवस्थापनातील सुलभता, डिजिटल सेवा (पान २ वर)

# संकटमोचक केवळ राजकारणापुरतेच का?

## शेतकऱ्यांच्या संकटात गिरीश महाजन कुठे आहेत? : खा. संजय राऊतांची टीका

प्रतिनिधी । जळगाव

**अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. सरकारने, पालकमंत्री, लोकप्रतिनिधींनी तातडीने या प्रकरणी संवेदना व्यक्त करणे गरजेचे होते. त्यांनी शेतकऱ्यांना तात्काळ मदत मिळावी, अशी मागणी केली नाही. शेतकऱ्यांना खूप हाल सहन करावे लागत आहेत. शहरातील शेतकऱ्यांनी प्रत्यक्ष मला भेटून शेतमालाची केळीसह गव्हाचे नुकसान झाल्याचे सांगितले.**



संजय राऊत म्हणाले की, संकटमोचक हे केवळ राजकीय संकटमोचकाचे काम करतात का? शेतकऱ्यांवर जेव्हा संकट येतात तेव्हा हे काही काम करताना दिसत नाही. केवळ पक्ष फोडणे, आमदार, नगरसेवक पळवणे हे त्यांचे कर्तव्य आहे का? हे राज्याचे दुर्दैव आहे, अशी टीका खा. संजय राऊत यांनी पत्रकाराशी बोलताना केली.

**मविआतील तिन्ही पक्ष एकत्र करतील विचार**

संजय राऊत म्हणाले की, राहुरी आणि बारामतीमध्ये पोटनिवडणूक आहे. मविआ म्हणून आपण निर्णय घेतला पाहिजे. राहुरीमध्ये प्राजक्त तनपुरे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडून चांगल्या प्रकारे ही निवडणूक लढवली होती. या निवडणुकीवर चर्चा होते. काँग्रेस अनेक ठिकाणी सर्वांत आधी निवडणूक लढवण्यासाठी पुढे जाते. निकालानंतर कळते आपण कुठे आहोत? जिथे ज्या पक्षाची ताकद आहे त्याच पक्षाने निवडणूक लढवावी. मविआतील तिन्ही पक्षांनी एकत्र येत निवडणुकीचा विचार केला पाहिजे, असेही खा. संजय राऊत यांनी बारामती, राहुरी पोटनिवडणुकीबाबत विचारलेल्या प्रश्नावर उत्तर देताना सांगितले.

### जिल्ह्यात पोलिसांच्या मदतीने गुंडगिरी

संजय राऊत म्हणाले की, जळगाव जिल्ह्यात राजकीय हुकुमशाही सुरू आहे. पोलिसांच्या मदतीने गुंडगिरी सुरू आहे, पोलिसांनी स्वत:ला वर्दीतील गुंड समजू नये. जळगावमध्ये पोलिस गणवेशातील हुकुमशाही सुरू आहे. त्याचा वापर राजकीय विरोधकांचा आवाज दडपण्यासाठी करत असतात. हळूहळू तुमचाही जोर ओसरणार आहे. पुढे बोलताना खा. राऊत म्हणाले की, शिंदे गटाचे पारोळा, मुक्ताईनगर, पाचोरा येथील आमदार हे संकटमोचकांच्या जास्त संपर्कात आहेत. ते पुढची निवडणूक भारतीय जनता पक्षाकडून लढवतील, असे वाटते.

### अवकाळी पावसामुळे द्राक्ष बागचं मोठं नुकसान

**धाराशिव -** भूम तालुक्याच्या चिंचपुर ढगे येथील रहिवासी अक्षय गोकुळ ढगे यांची बेलगाव तलाठी सज्जातील द्राक्षेंची बाग रात्रीच्या वादळीवाऱ्याने भुईसपाट झाली. काढणीला आलेली ही द्राक्षबाग खाली झोपल्याने मोठं आर्थिक नुकसान या शेतकऱ्याचं झालं आहे.



## संपादकीय

### भारतीय ग्राहक गॅसवर

सरकारने व्यावसायिक व घरगुती गॅस सिलिंडरच्या किमती वाढवल्या असल्या, तरी पेट्रोल व डीझेलचे दर स्थिर आहेत. औद्योगिक वापरासाठीच्या डीझेलच्या किमतीत मात्र प्रतिलिटर २२ रुपयांची वाढ झाली आहे. युद्ध दीर्घकाळ सुरू राहिल्यास, सरकारला इंधनाचे दर वाढवणे भाग पडेल. त्यानंतर मात्र महागाई आणखी वाढण्याची भीती आहे. पश्चिम आशियातील युद्ध संपण्याऐवजी ते अधिकच तीव्र होत आहे. त्यामुळे भारताच्या लिक्विफाइड पेट्रोलियम गॅस (एलपीजी) आणि लिक्विफाइड नॅचरल गॅस (एलएनजी) पुरवठ्यावर नक्कीच परिणाम झाला आहे. कच्च्या तेलाच्या पुरवठ्यास फटका बसलेला आहेच; परंतु एलपीजी आणि एलएनजीबाबत आपण अधिक तीव्र परिणाम सोसत आहोत. भारताचे या दोन्ही प्रकारचे ६० टक्के इंधन हे आयात केले जाते. त्यापैकी ९० टक्के माल हा होर्मुझ सामुद्रधुनीच्या मार्गाने येतो. भारताची जहाजे तेथून सोडण्यास येतील असे सांगण्यात आले असले, तरी बरीच जहाजे अजून अडकून पडलेली आहेत. शिवाय सततच्या बॉम्बहल्ल्यांमुळे जहाज वाहतुकीचा वेगही मंद आहे. आता होर्मुझमधून जाणाऱ्या जहाजांवर इराण टोल लावणार आहे. देशातील औद्योगिक आणि व्यापारी वापराच्या गॅसपुरवठ्यावर परिणाम झाला आहे. एलएनजीचा पुरवठा ३० टक्क्यांनी कमी झाला आहे. भारतात वार्षिक उपभोगाच्या प्रमाणात ६० टक्के एलपीजीची आयात केली जाते. एकूण ३ कोटी ३० लाख टन एवढी मागणी असून, देशात फक्त १ कोटी ३० लाख टन एलपीजीचे उत्पादन होते. तर एलएनजीची वार्षिक मागणी ७१ अब्ज घनमीटर इतकी असून, फक्त ३५ अब्ज घनमीटर हे देशांतर्गत उत्पादन आहे. तातडीने देशांतर्गत उत्पादन वाढवणे जिकिरीचे आहे. कारण एलपीजी व एलएनजीची झळ ग्राहकांना पोहोचणार हे नक्की. मुळातच भारताची अर्थव्यवस्था मजबूत पायावर उभी असून, इंधनाचा सध्या तरी पुरेसा पुरवठा आहे. पेट्रोलियम उत्पादने आणि एलपीजीच्या उपलब्धतेबाबत ताबडतोब काळजी करण्याचे कारण नाही, असे केंद्र सरकारचे म्हणणे आहे. युद्ध सुरू झाले, तेव्हा देशांतर्गत एलपीजी उत्पादन २८ टक्के होते. ते वाढून आता ६० टक्क्यांपर्यंत पोहोचले आहे; परंतु तेदेखील पुरेसे नाही. इराणने ज्या पाच देशांना होर्मुझची वाट मोकळी करून दिली आहे, त्यात भारताचा समावेश आहे. जगातील अशा युद्धजन्य परिस्थितीतदेखील एस अँड पी ग्लोबल या जगद्विख्यात पतमानांकन संस्थेने, भारतीय अर्थव्यवस्था २०२६-२७ या आर्थिक वर्षात ७.१ टक्क्यांनी वाढेल, असा अंदाज व्यक्त केला आहे. पूर्वीच्या अंदाजात ०.४० टक्क्यांची वाढ करण्यात आली आहे, हे लक्षणीय म्हणावे लागेल. याचा अर्थ, चालू आर्थिक वर्षाच्या तुलनेत मार्च २०२७ अखेरीस संपणाऱ्या आर्थिक वर्षात अर्थगतीचा वेग फक्त अर्ध्या टक्क्याने घटेल, असा होरा व्यक्त करण्यात आला आहे. याउलट अमेरिका-इस्रायलविरुद्ध इराण संघर्षामुळे आशिया पॅसिफिक देशांची विकासगती वर्षअखेरीपर्यंत ०.५ ते ०.७ टक्क्याने कमी होईल, अशी शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. म्हणजे भारताची स्थिती त्यातल्या त्यात बरीच म्हणायची. बॉम्ब फेक, क्षेपणास्त्र व ड्रोनहल्ले यामुळे हवाई तसेच सागरी वाहतूक खोळंबून राहिली आहे. पुरवठासाखळी विस्कळीत झाल्याने कच्चे तेल, पेट्रोल व डीझेल यांची टंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे, असा एस अँड पी या पतमानांकन संस्थेचा अंदाज आहे. इंधनाची सर्वाधिक आयात करणाऱ्या देशांत जपान व भारताचा समावेश होतो. त्यामुळे सध्याच्या ज्वलंत वास्तवाचा भारतीय अर्थव्यवस्थेवर काहीच परिणाम होणार नाही, असे म्हणता येणार नाही; परंतु इराणने भारतास झुकते माप दिल्याचा आपल्याला फायदा होणार आहे, हे नक्की. इंधन महागल्यास, त्याचा शेती, उत्पादनक्षेत्र व सेवाक्षेत्र या सगळ्यावर परिणाम होत असतो. काही काळापूर्वी भारतातील चलनवाढ उणे स्थितीत होती. उलट यंदा महागाई निर्देशांक ४.३ टक्क्यांवर राहील, अशी एकूण चिन्हे आहेत. सेवाक्षेत्राच्या उत्तम कामगिरीमुळे चालू खात्यातील तूट सध्या आटोक्यात आहे.

# शहाद्यात शेकडो कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश

## निवडून येण्याच्या निकषावरच जि.प.निवडणुकीत उमेदवारी : आ.रघुवंशी

प्रतिनिधी । शहादा

**शिवसेना पक्ष हा सर्वसामान्य कार्यकर्त्यांचा आहे. या पक्षात कधीही भेदभाव केला जात नाही. पक्षातील सर्वच नेते कार्यकर्त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे असून कार्यकर्त्यांसह जनतेची कामे प्राधान्याने झाली पाहिजे, या विचाराने शिवसेना पक्षाची वाटचाल सुरू आहे. आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत सर्वांनाच उमेदवारी देणे शक्य नाही. मात्र, निवडून येण्याच्या निकषावरच उमेदवारी दिली जाईल. ज्या कार्यकर्त्यांची जनतेत चांगली प्रतिमा आहे त्यास प्राधान्य देण्यात येईल, असे प्रतिपादन आ.चंद्रकांत रघुवंशी यांनी केले.**



शहादा येथे कार्यकर्त्यांच्या शिवसेना पक्षात प्रवेशाप्रसंगी ते बोलत केले. शहादा तालुक्यातील शेकडो कार्यकर्त्यांनी येथील शिवसेना कार्यालयात शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला. या प्रवेश सोहळ्याप्रसंगी आ. चंद्रकांत रघुवंशी यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. यावेळी नंदुरबारचे माजी नगराध्यक्ष कुणाल वसावे, शहादा शहरप्रमुख जितेंद्र जमदाडे, लोणखेडा येथील भरोसा मोरे, टेंभलीचे सरपंच आजाद ठाकरे, माजी उपनगराध्यक्ष जाहीर शेख, नंदुरबारचे नगरसेवक हिमांशू पाटील, कुऊबासचे उपसभापती छोटू पाटील आदी उपस्थित होते. यावेळी शहादा तालुक्यातील लोणखेडा, अनरद, टेंभली, होळ, आसुस, अवघे येथील शेकडो कार्यकर्त्यांनी शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला. आ. रघुवंशी म्हणाले शिवसेनेत जनसेवा हेच पक्षाचे ध्येय असल्याने परिसरात रुग्णांच्या सेवेसाठी रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यात आली आहे. कार्यकर्त्यांनीही जबाबदारीने शिवसेना पक्ष वाढीसाठी व जनतेची कामे करण्यासाठी कटिबद्ध असणे आवश्यक आहे. शहरप्रमुख जितेंद्र जमदाडे म्हणाले, आ. चंद्रकांत रघुवंशी यांच्या विकासात्मक कार्यावर विश्वास ठेवून तालुक्यातील शेकडो कार्यकर्ते शिवसेनेत प्रवेशासाठी इच्छुक होते. या सर्व कार्यकर्त्यांनी माझ्याशी संपर्क साधात पक्षात काम करण्याची इच्छा दाखवली. त्या अनुषंगाने आज शेकडो कार्यकर्त्यांनी आ. रघुवंशी यांच्या उपस्थितीत जाहीर प्रवेश केला. भविष्यात आणखी शेकडो कार्यकर्ते पक्षात प्रवेश घेण्यासाठी इच्छुक असल्याचेही त्यांनी सांगितले.

## एक शाम खाटू नरेशजी के नाम आज कार्यक्रम

प्रतिनिधी । शहादा

**शाम खाटू नरेशजी के नामवर आधारित श्री खाटू श्याम बाबाजी यांच्या भजनसंध्येचा कार्यक्रम हायस्कूलच्या विकास प्रांगणात दि.४ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आला आहे.**

भक्तिमार्ग सेवा समिती, श्री श्याम सेवा समिती, पतंजली योग समिती, जायंट्स परिवार शहादा व श्री अभिजीत दादा मित्र परिवारातर्फे शहरातील विकास हायस्कूलच्या प्रांगणात शनिवारी दि.४ एप्रिल रोजी सायंकाळी सात वाजता श्री खाटू श्याम बाबांच्या भजनाच्या कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमात दरबार सेवा श्री श्याम सुंदर सरकार नरेश देणार आहेत. संगीतकार कार्तिक जैन म्युझिकल ग्रुप इंदोर, भजन संध्याचे सुप्रसिद्ध गायक शुभम सेन व गायिका गुणगुण व गुंजन तिवारी शहागंज मध्य प्रदेश हे श्री खाटू श्याम बाबांचे भजने सादर करणार आहे.

## अवकाळी पावसाने ४२ गावे बाधित : आ.राम भदाणे

प्रतिनिधी । धुळे

**अवकाळी पावसाने दाणादाण उडविली असून गारपीटमुळे रब्बी हंगामाचे अतोनात नुकसान झाले. या नुकसानीमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक कंबरडे मोडले आहे. अशा स्थितीमध्ये शेतकरी हवालदिल झालेला आहे. सततच्या नुकसानीमुळे त्याचे आर्थिक गणित बिघडले आहे. शासनाकडे पंचनामे अहवाल सादर झाल्यानंतर तात्काळ संपुर्ण क्षेत्रासाठीची मदत घोषित करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा असे निवेदन मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांना आ.राम भदाणे यांनी दिले.**

या निवेदनात म्हटले आहे की, धुळे तालुक्यात मार्च महिन्याच्या उत्तरार्धात सलग दोन दिवस अवकाळी पाऊस झाला. दोन टप्प्यात सलग दोन दिवस पाऊस झाला. मार्च एन्डींगला तर बोरांच्या आकारांची गारपीट झाली. गारपीटीमुळे तर रब्बी हंगामातील काढणीस आलेले मका, ज्वारी, बाजरी व कांद्याचे खूप मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. कांदा पुर्णतः पावसात भिजला. गहू, ज्वारी, मका व बाजरी भुईसपाट झाल्याने मोठे नुकसान झाले आहे. विशेष म्हणजे काढणीचा खर्च वाढणार आहे. काढणीचा खर्च, उत्पादन आणि मिळणारा भाव याची ताळमेळ बसणार नाही. पुन्हा एकदा शेतकऱ्यांचे आर्थिक गणित बिघडले आहे. धुळे तालुक्यातील बेचाळीसपेक्षा अधिक गावे अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे बाधित झालेली आहेत. सुमारे ४ हजार ९५१ पेक्षा अधिक शेतकरी बाधित झालेले आहेत. ३ हजार ९४२ हेक्टर क्षेत्राचे नुकसान झालेले आहे. आता रब्बीचे नुकसान झालेले आहे. पंचनामा झालेल्या क्षेत्राचे पंचनामे झाल्यानंतर शासनाला अहवाल झाल्याबरोबर तात्काळ मदत घोषित करून रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर टाकावी, असा आग्रह आ.राम भदाणे यांनी केलेला आहे.

## तापीच्या पात्रात सापडला शहाद्यातील लिपिकाचा मृतदेह

### दुचाकी टाकरखेडा शिवारातील हॉटेलजवळ सापडली; अकस्मात मृत्यूची नोंद

प्रतिनिधी । शहादा

शहाद्यातील विकास हायस्कूलमधील लिपीक गिरीश यशवंत कुलकर्णी (वय ४१) यांचा धुळे जिल्ह्याच्या शिंदखेडा तालुक्यातील टाकरखेडा शिवारातील तापीनदीच्या पात्रात बुडून मृत्यू झाल्याने खळबळ उडाली आहे. कुलकर्णी यांची दुचाकी घटनास्थळापासून जवळच असलेल्या एका हॉटेलजवळ सापडली असून, या प्रकरणी अकस्मात मृत्यू म्हणून नोंद करण्यात आली असली तरी पोलिस सर्व शक्यतांच्या अनुषंगाने तपास करीत आहेत.

याबाबत माहिती अशी की, शहाद्यातील रश्मीनगर भागात राहणारे गिरीश कुलकर्णी कामानिमित्त बाहेर जात असल्याचे सांगून सकाळी दुचाकी घेऊन घराबाहेर पडले होते. मात्र, संध्याकाळपर्यंत घरी न परतल्याने कुटुंबियांनी शोधाशोध सुरू केली. याच दरम्यान कुलकर्णी यांची दुचाकी शिंदखेडा तालुक्यातील टाकरखेडा शिवारात एका हॉटेलजवळ उभी असल्याची माहिती मिळाल्यावर कुटुंबियांनी तिकडे धाव घेतली. येथून जवळच तापीनदीच्या पात्रात सारंगखेडा बॅरेज असल्याने कुलकर्णी यांच्या कुटुंबाला शंका आली. त्यांनी तापी नदीपात्राकडे धाव घेत नदीच्या पात्रात कुलकर्णी यांचा शोध घेण्यासाठी मच्छीमारांना विनंती केली. मच्छीमारांनी बराच वेळ शोध घेतल्यावर अखेर सकाळी ११.३० वाजेच्या सुमारास कुलकर्णी यांचा मृतदेह बॅरेजमध्ये हाती लागला. तातडीने याबाबतची माहिती सारंगखेडा पोलिसांनी देण्यात आली.

सारंगखेडा पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर शहादा ग्रामीण रुग्णालयात त्यांचा मृतदेह शवविच्छेदनासाठी रवाना केला. यानंतर मृतदेह कुटुंबियांच्या ताब्यात देण्यात आला. दरम्यान, तूर्तास या प्रकरणी सुहास राजेंद्र कुलकर्णी यांच्या खबरीवरून अकस्मात मृत्यू म्हणून नोंद करण्यात आली आहे. गिरीश कुलकर्णी यांच्या पश्चात आई, पत्नी, एक मुलगा व एक मुलगी असा परिवार आहे.

### शाळांची बनवेगिरी होणार उघड; शिक्षण संचालकांचे आदेश

## परीक्षेवेळीच होणार विद्यार्थ्यांची पटपडताळणी

प्रतिनिधी । जळगाव

**शाळांनी संचमान्यतेत नोंदविलेली वर्गनिहाय पटसंख्या आणि प्रत्यक्षातील विद्यार्थी यांची खातरजमा करण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला आहे. प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी तसेच आणि माध्य व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक महेश पालकर यांनी प्रसिद्ध केलेल्या पत्रकाद्वारे संपूर्ण महाराष्ट्रात एकाच वेळी विद्यार्थी संख्याची गणना केली जाणार असून एप्रिल महिन्यात ११, १५ आणि २२ या दिवशी पटपडताळणी होणार आहे.**

इयत्ता दुसरी ते नववी आणि अकरावी या वर्गातील विद्यार्थ्यांची वरील तारखेच्या अनुक्रमे मराठी भौतिकशास्त्र आणि इंग्रजी या विषयाच्या पेपरच्या दिवशी ही पटपडताळणी करण्यात येईल. इयत्ता दहावी आणि बारावी या विद्यार्थ्यांची स्वतंत्र पटपडताळणी केली जाणार नसून त्यांची बोर्ड पेपरची उपस्थिती ग्राह्य धरण्यात येणार आहे. संपूर्ण राज्यात एकाच वेळेस ही प्रक्रिया राबवण्यात येत असल्यामुळे मोठ्या प्रमाणात मनुष्यबळाचे आवश्यकता भासणार असून त्यासाठी शिक्षणाधिकारी, लेखाधिकारी, डाएट अधिव्याख्याते, इतर प्रशासकीय अधिकारी, तालुका स्तरावरील गटशिक्षणाधिकारी, केंद्रप्रमुख यांची नियुक्ती यासाठी केली जाणार आहे. शाळांना भेट देणारे वरीलअधिकारी, कर्मचारी लॉगिनद्वारे हजर आणि गैरहजर विद्यार्थ्याची नोंद घेतील. यापूर्वी शाळा सुरु असताना पटपडताळणी व्हायची, यंदा पहिल्यांदाच परीक्षा सुरु असताना विद्यार्थ्यांच्या उपस्थितीवरुन पटसंख्या मोजली जाणार आहे.

## पान १ वरुन

**राहुरी पोटनिवडणुकीत......**

निवडणुकीत शिवाजी कर्डिले यांच्या विरोधात राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) माजी आमदार प्राजक्त तनपुरे यांनी लढत दिली होती. मात्र आता तनपुरे राष्ट्रवादीमध्ये असले तरी ते राष्ट्रवादीच्या पक्ष चिन्हावर निवडणूक लढवण्याच्या मनस्थितीत नाहीत. त्यांनी निवडणूक लढवण्याचा निर्णय जाहीर केला असला तरी ते अपक्ष उमेदवारी करण्याच्या मनस्थितीत आहेत. निवडणुकीच्या पूर्वतयारीसाठी तनपुरे यांनी मतदारसंघातून यात्रा काढली. या यात्रेतही त्यांनी कोठे राष्ट्रवादीचे पक्ष चिन्ह झळकवले नाही तसेच अलीकडच्या काळात ते भगवी टोपी, भगवे उपरणं परिधान करून नागरिकांशी संपर्क करताना दिसतात. त्यामुळे ते अपक्ष उमेदवारी करतील असे त्यांचे समर्थक सांगतात. काँग्रेसच्या संघटन सृजन अभियानानिमित्त माजी मंत्री बाळासाहेब थोरात आज नगरमध्ये होते. पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी राहुरी निवडणुकीत काँग्रेस उमेदवार देईल असे सांगितले. महाविकास आघाडीतील शरद पवार गटाचे प्राजक्त तनपुरे आमच्या संपर्कात नाहीत, असे सांगताना थोरात यांनी काँग्रेस उमेदवार देणार असल्याचा व तो निवडूनही येईल, असाही दावा केला आहे.

**महसूल, प्रवासी सेवा......**

आणि वेळेचे काटेकोर पालन यामुळे प्रवाशांचा अनुभव अधिक सोयीस्कर झाला आहे. ६,६५० टन शेती मालाची वाहतूक - माल वाहतुकीच्या बाबतीत मध्य रेल्वेच्या भुसावळ विभागाने कृषी क्षेत्राला मोठा आधार दिला आहे. शेतकरी समृद्धी विशेष रेल या उपक्रमाअंतर्गत ५२ फेऱ्यांमधून ६,६५० टन शेती मालाची वाहतूक करण्यात आली. या माध्यमातून रेल्वेला २.४० कोटी रुपयांचा महसूल मिळाला असून, शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनासाठी जलद आणि सुरक्षित बाजारपेठ उपलब्ध झाली आहे. या उपक्रमामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळाल्याचेही अग्रवाल यांनी नमूद केले. विभागाने माल वाहतुकीतील वेळ आणि खर्च कमी करण्यासाठी विविध उपाययोजना राबवल्या आहेत. लॉजिस्टिक्स व्यवस्थापन अधिक सक्षम करण्यासाठी तांत्रिक सुधारणा आणि समन्वय वाढवण्यात आला आहे.

**रशियाने दिले भारताला......**

भारताला अधिक कच्च्या तेलाचा पुरवठा करण्यास रशिया उत्सुक आहे. रशियन कंपन्या भारताला कच्च्या तेलाचा आणि एलएनजीचा पुरवठा दीर्घकाळापर्यंत वाढवण्यास सज्ज असल्याचे उपपंतप्रधानांनी आश्वासन दिले आहे. जुलै महिन्यापर्यंत रशिया भारताच्या एकूण तेल आयातीपैकी सुमारे २५% वाटा पुरवू शकतो, असे भारतीय प्रसारमाध्यमांनी दिलेल्या वृत्तावरून समोर आले आहे. रशियाकडून भारताला होणारा तेलाचा पुरवठा वाढल्यास देशाला ऊर्जेच्या वैविध्यपूर्ण स्रोतांचा फायदा होऊ शकेल. पश्चिम आशियाई राष्ट्रांकडून भारताला कच्च्या तेलाचा पुरवठा होत नसल्यामुळे रशिया केवळ अतिरिक्त तेलाचा पुरवठाच करणार नाही, तर तेलाची किंमत कदाचित अधिक स्वस्तही करू शकेल. भारत दरवर्षी तेलाचा वापर करणाऱ्या जगातील प्रमुख देशांपैकी त्यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी तेलाचा अखंडित पुरवठा होणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

**इराणने अमेझॉनच्या डेटा......**

दोन वेब सर्व्हिस सेंटर्सला लक्ष्य केले होते. त्यानंतर इराणकडून आता बहारिनमधल्या अमेझॉनच्या डेटा सेंटरवर १ एप्रिल रोजी, तर दुबईतील ऑरेकल कंपनीच्या डेटा सेंटरवर काल (२ एप्रिल) हल्ला झाला. दरम्यान, इराणमधील डेटा सेंटरवर देखील अमेरिका व इस्रायलकडून हल्ला झाला आहे. इराणची राष्ट्रीयीकृत बँक असलेल्या ङ्गसेपाहफ या बँकेच्या तेहरान येथील डेटा सेंटरवर ११ मार्च रोजी हल्ला झाला होता, ङ्गद जेरूसलेम पोस्टफया वृत्तसंस्थेने याबाबत वृत्त दिले होते. डेटा सेंटर्सवर होणाऱ्या हल्ल्यांचा ट्रेंड बदलला - डेटा सेंटर्सची हेरगिरी तसेच त्यावर सायबर हल्ला होण्याचे प्रकार या आधी घडत होते.

## निवृत्त नायब तहसीलदाराच्या घरातून गॅस सिलिंडरची चोरी

प्रतिनिधी । जळगाव

**शहरातील श्रद्धा हौसिंग सोसायटीतील एका सेवानिवृत्त नायब तहसीलदाराचे घर चोरट्यांनी लक्ष्य केले आहे. चोरट्यांनी घराचा कडी-कोंडा कापून पाणी उपसण्याची मोटार आणि गॅस सिलिंडर चोरून नेले आहे.**

जळगावातील भिकमचंद नगर भागातील श्रद्धा हौसिंग सोसायटीत राहणारे मनोहर सुकलाल ठाकरे (वय ७४, निवृत्त नायब तहसीलदार) हे दि.४ मार्च ते १ एप्रिल या कालावधीत बाहेरगावी गेले होते. याच संधीचा फायदा घेत अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या बंद घराच्या दरवाजाचा कडी-कोंडा कापून आत प्रवेश केला. चोरट्यांनी घरातून ४ हजार रुपये किमतीची टेक्समो कंपनीची अर्धा अश्वशक्तीची पाण्याची मोटार आणि २,५०० रुपये किमतीचा भारत गॅस कंपनीचा भरलेला एलपीजी सिलिंडर, असा एकूण ६,५०० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला आहे. ठाकरे हे घरी परतल्यानंतर त्यांना चोरी झाल्याचे लक्षात आले. याप्रकरणी त्यांनी जळगाव शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. पोलिसांनी या प्रकरणी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक सागर शिंपी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेड कॉन्स्टेबल उमेश भांडारकर करत आहेत.

## नाशिकरोड रेल्वेस्थानकाचे नाव बदलण्यास मनसेचा विरोध

प्रतिनिधी । नाशिक

**नाशिकरोड रेल्वेस्थानकाचे नाव बदलण्याच्या महापालिकेच्या प्रस्तावाविरोधात मनसेने तीव्र विरोध केला आहे. मनसेतर्फे महापालिकेच्या नाशिकरोड विभागीय अधिकारी प्रज्ञा त्रिभुवन यांना निवेदन दिले.**



मनसे विद्यार्थी सेनेचे प्रदेश कार्यकारणी सदस्य उमेश भोई, मनसे उपजिल्हाध्यक्ष संतोष सहाणे, शहर उपाध्यक्ष नितीन पंडित, मनविसे उपजिल्हाध्यक्ष नितीन धानापुणे,शशी चौधरी, संदीप आहेर, अमर जमधडे उपस्थित होते. नाशिकरोड रेल्वेस्थानकाचे नाव बदलून नाशिक रेल्वेस्थानक करण्याचा प्रस्ताव महासभेने चर्चा न करता मंजूर केला असे समजते. रेल्वेस्थानकाचे नाव बदलण्याचे सर्व अधिकार रेल्वे मंत्रालय आणि केंद्र सरकारकडे आहेत. महापालिकेने असा प्रस्ताव मांडणे तांत्रिकदृष्ट्या योग्य नाही. नाशिकरोड ही या परिसराची ऐतिहासिक ओळख आहे. ब्रिटीश काळापासून हे नाव प्रचलित असून, देशभरातील प्रवाशांच्या मनात या नावाने घर केले आहे. महापालिकेने नावाच्या वादात शक्ती खर्च करण्यापेक्षा नाशिक रोड परिसरातील पायाभूत सुविधा, स्वच्छता आणि वाहतूक कोंडी, खड्डे यांकडे लक्ष द्यावे,असे निवेदनात म्हटले आहे.

# पटेल सीबीएसई स्कूलने ७ लाखांचे तृतीय क्रमांकाचे बक्षीस पटकावले

प्रतिनिधी । शिरपूर

**शहरातील अमरिशभाई आर.पटेल सीबीएसई स्कूलने आंतरराष्ट्रीय स्पर्धेत उत्तम कामगिरी बजावत ७ लाख रुपयांचे जागतिक दर्जाचे तृतीय क्रमांकाचे बक्षीस पटकावले आहे.**



शाळेच्या विद्यार्थ्यांनी हायड्रा पल्स या अभिनव प्रकल्पाच्या जोरावर एमटीएमसी ग्लोबल चॅलेंज २०२६ या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत ऑनरेबल मेंशन पारितोषिक मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. ओटीस कंपनीद्वारे राबवली जाणाऱ्या सीएसआर उपक्रमांतर्गत एमटीएमसी ग्लोबल चॅलेंज २०२६ ऑनलाईन स्वरूपात होणारी स्पर्धा दरवर्षी राबवली जाते. सीजन ६ मध्ये या वर्षी सुद्धा राबविण्यात आली होती. या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत आशिया खंडातील विविध देशामधील शाळांनी ऑनलाईन सहभाग घेतला होता. यामध्ये कोरिया आणि जापानचे दोन परीक्षक होते. जागतिक स्तरावर कोरियन, जापनीज आणि सिंगापूरच्या स्कूलला टक्कर देऊन एक मानाचा झेंडा रोवला व जागतिक स्तरावर अमरिशभाई आर. पटेल स्कूलने तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या या प्रकल्पात जगासमोरील गंभीर समस्या असलेल्या पाणीटंचाईवर प्रभावी उपाय सुचविण्यात आला. इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांनी ड्रोन-आधारित सिंचन प्रणाली आणि स्मार्ट मोबाईल ॲप यांचा समन्वय साधत, पिकांच्या गरजेनुसार अचूक आणि कार्यक्षम पाणीपुरवठा करणारी आधुनिक यंत्रणा विकसित केली. या प्रकल्पातून पर्यावरणपूरक दृष्टिकोन, वैज्ञानिक विचारसरणी आणि संसाधनांचा योग्य वापर यांचा उत्कृष्ट नमुना सादर झाला. जगभरातील कुशल संघांशी स्पर्धा करत विद्यार्थ्यांनी २०.२ गुण मिळवत प्रभावी कामगिरी केली. त्यांच्या नाविन्यपूर्ण आणि उपयुक्त कल्पनेची दाखल घेऊन शाळेला ७,५०० अमेरिकन डॉलर्स म्हणजेच सुमारे ७ लाख रुपयांचे अनुदान देण्यात आले. हा प्रकल्प इयत्ता नववीचे हंसिका प्रमोद भोपे, दिशिता राहुल साळुंखे, विदुला राहुलकुमार कामडे, वंश विकेश सिंह, रणवीर अमित परदेशी, आरोही मनीष गगराणी, अनुष्का अमोल पाटील, क्षितिजा उमेश पवार या आठ विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली साकारला. या यशाबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष आ. अमरिशभाई पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, नगराध्यक्ष चिंतनभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, सचिव रेशा पटेल, कोषाध्यक्ष बबनलाल अग्रवाल, संचालक अतुल भंडारी, संचालक विजय भंडारी, प्राचार्या स्मिता उगले यांनी कौतुक केले.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक - सागर काशिनाथ ओतारी (मोबा.- ९९७००५३०६६) व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
✻ कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी (✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७-२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

# जामनेरमध्ये नागरिकांचा गॅस सिलिंडरसाठी रास्तारोको

## भारत गॅसच्या नव्या ओटीपी नियमामुळे वितरणात तांत्रिक खोळंबा

प्रतिनिधी । जामनेर

**शहरात गॅस सिलिंडर वितरण व्यवस्थेत अचानक निर्माण झालेल्या तांत्रिक अडचणी आणि नव्या नियमांमुळे मोठा गोंधळ उडाला आहे. सिलिंडर मिळत नसल्याने संतप्त झालेल्या नागरिकांनी गॅस एजन्सीसमोर जोरदार निदर्शने करत भुसावळ छत्रपती संभाजीनगर मार्गावर रास्ता रोको आंदोलन केले. या आंदोलनामुळे काही काळ वाहतूक पूर्णपणे ठप्प होऊन परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.**



भारत गॅस कंपनीने अलीकडेच सिलिंडर वितरणाबाबत नवीन धोरण लागू केले आहे. या धोरणानुसार गॅस एजन्सींना थेट बुकिंग स्वीकारण्याचे अधिकार काढून घेण्यात आले असून, ग्राहकांना त्यांच्या नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावरूनच बुकिंग करणे अनिवार्य करण्यात आले आहे. विशेष म्हणजे बुकिंगनंतर मिळणाऱ्या ओटीपीशिवाय सिलिंडर देण्यात येणार नाही, अशी अट लागू करण्यात आली आहे. मात्र, या बदलाची पुरेशी माहिती ग्राहकांपर्यंत पोहोचली नसल्याने जामनेरमध्ये मोठा गोंधळ निर्माण झाला. सकाळपासूनच गॅस एजन्सीवर ग्राहकांची प्रचंड गर्दी उसळली होती. अनेक ग्राहकांनी प्रत्यक्ष एजन्सीवर जाऊन सिलिंडर मिळवण्याचा प्रयत्न केला. मात्र, ऑनलाइन बुकिंग आणि ओटीपी प्रक्रियेमुळे त्यांना सिलिंडर मिळू शकले नाही. तासनतास रांगेत उभे राहूनही सिलिंडर न मिळाल्याने नागरिकांचा संयम सुटला. या पार्श्वभूमीवर संतप्त नागरिकांनी एजन्सीसमोर जोरदार घोषणाबाजी करत निषेध व्यक्त केला आणि पुढे जाऊन भुसावळ छत्रपती संभाजीनगर मार्गावर रिकामे गॅस सिलिंडर रस्त्यावर आडवे टाकून रास्तारोको केला. अचानक झालेल्या या आंदोलनामुळे दोन्ही बाजूंनी वाहनांच्या रांगा लागल्या. प्रसंगी वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली. काही प्रवाशांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागले. नव्या नियमांनुसार ग्रामीण भागातील ग्राहकांना बुकिंगनंतर ४५ दिवसांनी तर शहरी भागातील ग्राहकांना २५ दिवसांनी सिलिंडर मिळणार असल्याची माहिती समोर आल्याने नागरिकांमध्ये अधिकच संताप पसरला. घरात गॅस संपलेला असताना इतके दिवस वाट कशी पाहायची?, असा सवाल अनेकांनी उपस्थित केला. तसेच तांत्रिक यंत्रणा सक्षम नसताना असे नियम लागू केल्याबद्दल नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

दरम्यान, मंत्री गिरीश महाजन यांच्या जामनेर मतदारसंघातच अशी परिस्थिती निर्माण झाल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. नागरिकांनी तातडीने तांत्रिक अडचणी दूर करून सिलिंडर वितरण सुरळीत करण्याची आणि नव्या नियमांबाबत स्पष्ट मार्गदर्शन देण्याची मागणी केली आहे. या घटनेमुळे ग्रामीण आणि शहरी भागातील गॅस वितरण व्यवस्थेतील त्रुटी पुन्हा एकदा समोर आल्या असून, प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे.

### ➤ पोलिसांचा बंदोबस्त

या घटनेची माहिती मिळताच पोलिस आणि पुरवठा विभागाचे अधिकारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी मोठा बंदोबस्त ठेवला होता. पुरवठा अधिकारी नारायण सुर्वे यांनी नागरिकांशी संवाद साधत परिस्थिती स्पष्ट केली. एजन्सीकडे गॅस सिलिंडरचा पुरेसा साठा उपलब्ध असून केवळ तांत्रिक अडचणींमुळे वितरणात अडथळे निर्माण झाले असल्याचे त्यांनी सांगितले. नोंदणीकृत मोबाईलवरून नियमानुसार बुकिंग केल्यास सर्व ग्राहकांना सिलिंडर मिळेल, असे आश्वासन त्यांनी दिले. पोलिसांच्या मध्यस्थीनंतर आणि प्रशासनाच्या आश्वासनानंतर अखेर आंदोलन मागे घेण्यात आले. तरीही नागरिकांनी प्रशासनाच्या नियोजन शून्यतेवर आणि माहितीअभावी निर्माण झालेल्या परिस्थितीवर तीव्र नाराजी व्यक्त केली.

# आधुनिक केळी शेती अन् मूल्यवर्धन प्रक्रियेची जिल्हाधिकाऱ्यांकडून पाहणी

प्रतिनिधी । जळगाव

**जळगाव जिल्ह्याची ओळख असलेल्या केळी पिकाच्या आधुनिक लागवड पद्धती तसेच निर्याताभिमुख मूल्यसाखळी प्रक्रियेची माहिती घेण्यासाठी जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी रावेर तालुक्यातील अटवाडे येथे प्रगतशील शेतकरी वरुण अग्रवाल यांच्या केळी बागेला भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली.**



या क्षेत्रभेटीद्वारे केळी शेतीतील आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, उत्पादनाची गुणवत्ता वाढविण्यासाठी केलेले प्रयोग तसेच कापणी पश्चात व्यवस्थापनाची प्रक्रिया यांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. या भेटीदरम्यान जिल्हाधिकाऱ्यांनी केळी लागवडीमध्ये वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिक मल्चिंग, गादीवाफा पद्धत, योग्य लागवड अंतर, तसेच दर्जेदार आणि निर्यातक्षम उत्पादन मिळण्यासाठी वापरले जाणारे बड इंजेक्शन तंत्रज्ञान याविषयी सविस्तर माहिती घेतली. आधुनिक मशागत तंत्रज्ञानाचा वापर करून पिकाची उत्पादकता वाढविणे, पाण्याचा कार्यक्षम वापर करणे आणि रोग-कीड नियंत्रण अधिक प्रभावीपणे करणे यासाठी या पद्धती कशा उपयुक्त ठरतात याबाबतही चर्चा करण्यात आली. तसेच शेतात केळी घडांची शास्त्रोक्त पद्धतीने होणारी कापणी, त्यानंतरची वर्गवारी (ग्रेडिंग), स्वच्छता, पॅकिंग आणि निर्यातीसाठी तयार होणारी प्रक्रिया यांचेही जिल्हाधिकाऱ्यांनी बारकाईने निरीक्षण केले. शेतातून थेट बाजारपेठेपर्यंत पोहोचणाऱ्या व्हॅल्यू चेन प्रक्रियेतील प्रत्येक टप्पा उत्पादनाच्या गुणवत्तेसाठी आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत स्पर्धात्मक स्थान मिळविण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा असल्याचे त्यांनी सांगितले. शेतकरी बांधवांशी संवाद साधताना घुगे यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार,गुणवत्तापूर्ण उत्पादन आणि मूल्यवर्धन यावर भर दिला. शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांनी एकत्रित येऊन प्रक्रिया उद्योग, पॅकिंग, साठवणूक व निर्यात याकडे लक्ष दिल्यास केळी पिकाला अधिक शाश्वत आणि चांगला बाजारभाव मिळू शकतो, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. जळगाव जिल्ह्यातील केळी उत्पादनाला राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठी मागणी असून रावेर परिसरातील शेतकऱ्यांनी आत्मसात केलेल्या आधुनिक पद्धतीमुळे या पिकाची गुणवत्ता अधिक सुधारत आहे. तंत्रज्ञानाचा वापर, योग्य व्यवस्थापन आणि मूल्यवर्धन यामुळे जळगावची केळी जागतिक स्तरावर आपली वेगळी ओळख निर्माण करत असून ही प्रगत शेती पद्धती इतर शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरत असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी नमूद केले.

## थोडक्यात

### जिल्ह्यात पंतप्रधान इंटर्नशिप योजनेंतर्गत १२ संधी उपलब्ध

**जळगाव ।** केंद्र शासनाच्या पंतप्रधान इंटर्नशिप योजनेच्या तिसऱ्या फेरीअंतर्गत जळगाव जिल्ह्यात विविध नामांकित कंपन्यांमध्ये इंटर्नशिपच्या १२ संधी उपलब्ध झाल्या आहेत. या योजनेंतर्गत उमेदवारांना ६ ते ९ महिन्यांसाठी इंटर्नशिप देण्यात येणार असून प्रतिमहा ९ हजार रुपये विद्यावेतन तसेच रुजू झाल्यानंतर ६ हजार रुपयांचे अनुदान देण्यात येणार आहे. जिल्ह्यात सध्या भारत पेट्रोलियम, डाबर इंडिया लिमिटेड, एचडीएफसी बँक, रिलायन्स इंडस्ट्रीज या कंपन्यांमध्ये संधी उपलब्ध असून दहावी, बारावी, डिप्लोमा व पदवीधर उमेदवार पात्र आहेत. अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, जळगाव येथे संपर्क साधावा, असे आवाहन सहाय्यक आयुक्त संदीप गायकवाड यांनी केले आहे.

### १५ एप्रिलपासून लिपीकांसाठी लेखा विषयक प्रशिक्षण

**जळगाव ।** महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागांतर्गत विभागीय सहसंचालक, लेखा व कोषागारे, नाशिक विभाग यांच्या मार्फत लिपीक वर्गीय गट क कर्मचाऱ्यांसाठी महाराष्ट्र लेखा लिपीक प्रशिक्षण दि. १५ एप्रिल ते २५ जून या कालावधीत आयोजित केले असल्याची माहिती विभागीय सहसंचालक बाबुलाल पाटील यांनी दिली आहे.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीची आज बैठक

**जळगाव । भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आगामी जयंती निमित्त जळगाव शहर उत्सव समितीच्यावतीने दि.४ एप्रिल रोजी संध्याकाळी पाच वाजता पद्मालय विश्रामगृह येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.**

यात जयंती उत्सवात विविधता, प्रबोधनपर कार्यक्रम, भीम महोत्सव, वैचारिक उत्सवाचे स्वरूप कसे देता येईल. संविधानाने देश किती सुरक्षित आहे. सर्वधर्मसमभाव कसा संविधानाने जोपासला आहे, अशा विविध अशा विषयानुरूप जयंती उत्सवाचे स्वरूपावर चर्चा करण्यात येवून नियोजन करण्यात येणार आहे. शहरातील सर्व मंडळाच्या अध्यक्षांनी बैठकीस उपस्थिती द्यावी, असे आवाहन उत्सव समितीचे अध्यक्ष मुकुंद सपकाळे यांनी केले आहे.

# फुकटपुरात भीषण आग; तीन घरे जळून खाक

प्रतिनिधी । जळगाव

**शहरातील इच्छादेवी मंदिराजवळील फुकटपुरा झोपडपट्टी भागात गुरुवारी रात्री पावणेदहा वाजेच्या सुमारास भीषण आग लागल्याची घटना घडली. सुरुवातीला एका घरापुरती मर्यादित असलेली ही आग काही मिनिटांतच रौद्ररूप धारण करत शेजारील घरांमध्ये पसरली आणि पाहता पाहता तीन घरांना वेढा घातला. या आगीत तिन्ही कुटुंबांचे संसारोपयोगी साहित्य पूर्णपणे जळून खाक झाले असून लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.**

भंगार व्यवसाय करणारे आरिफ शेख हे आपल्या घरात झोपलेले असताना त्यांच्या घराला आग लागली. आग लागल्याचे लक्षात येताच त्यांनी तात्काळ घराबाहेर धाव घेत स्वतःचा जीव वाचवला. मात्र, काही क्षणांतच आगीने भीषण रूप घेत शेजारील रफिक शेख आणि गंगाबाई मरसाळे यांच्या घरांनाही वेढा घातला. आगीच्या लाटा इतक्या तीव्र होत्या की काही मिनिटांतच तिन्ही घरांतील सर्व वस्तू जळून खाक झाल्या. आपल्या डोळ्यांसमोर संसार जळताना पाहून कुटुंबीयांना अश्रू अनावर झाले होते. प्राथमिक अंदाजानुसार, शॉर्ट सर्किटमुळे ही आग लागल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान, आग लागल्याची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. स्थानिक तरुणांनी जीवाची पर्वा न करता आग विझवण्याचा प्रयत्न केला. विशेष म्हणजे, घरांमध्ये असलेले गॅस सिलिंडर वेळेवर बाहेर काढण्यात आल्याने मोठा स्फोट होण्याचा धोका टळला. या घटनेची माहिती मिळताच माजी नगरसेवक प्रशांत नाईक यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत महापालिकेच्या अग्निशमन विभागाशी संपर्क साधला. काही वेळातच अग्निशमन दलाचे चार बंब घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन दलाच्या जवानांनी शर्थीचे प्रयत्न करत आगीवर नियंत्रण मिळवले

# जळगावात फिल्मी स्टाईल एटीएम फोडले

प्रतिनिधी । जळगाव




शहराच्या पोलन पेठ परिसरात गुरुवारी मध्यरात्रीनंतर घडलेल्या धाडसी चोरीच्या घटनेने संपूर्ण शहर हादरले आहे. अज्ञात चोरट्यांनी अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने एका बँकेचे एटीएम मशीन उखडून नेऊन त्यातील सुमारे सात लाख रुपयांची रोकड लंपास केली. या प्रकरणी जळगाव शहर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुरुवारी मध्यरात्रीनंतर साधारण एक वाजण्याच्या सुमारास चोरट्यांनी प्रथम जोशी पेठ परिसरातून एक मालवाहू वाहनाची चोरी केली. हे वाहन चोरी करून त्यांनी थेट पोलन पेठेतीलच सत्यम प्लाझामधील एक्टिटास स्मॉल फायनान्सचे एटीएम केंद्र गाठले. रात्री १:२५ वाजता एक चोरटा तोंडावर रुमाल बांधून एटीएम केंद्रात प्रवेश करताना दिसतो. त्याने अत्यंत कौशल्याने आणि वेगाने एटीएम मशीनला मजबूत दोरखंड बांधला. त्यानंतर बाहेर उभ्या असलेल्या मालवाहू वाहनाला हा दोर जोडण्यात आला. काही क्षणांतच वाहनाला जोरात हिसका देण्यात आला. आणि एटीएम मशीन जागेवरून उखडून खाली कोसळले. मशीन खाली पडताच बाहेर दबा धरून बसलेले आणखी तीन साथीदार आत धावून आले. त्यांनी मिळून अवघ्या सहा मिनिटांत संपूर्ण मशीन उचलून वाहनात टाकले. रात्री १:३१ वाजेपर्यंत हा संपूर्ण प्रकार पूर्ण झाला. आणि चोरटे भुसावळच्या दिशेने फरार झाले. चोरट्यांनी दरोडा इतक्या जलद आणि शिताफीने पार पाडला की परिसरातील रहिवाशांना याची कुठलीही चाहूल देखील लागली नाही. मात्र, संपूर्ण घटनेचे सर्व चित्रीकरण सीसीटीव्ही कॅमेऱ्यात स्पष्टपणे कैद झाले आहे. घटनेची माहिती मिळताच जळगाव शहर पोलिसांनी तातडीने नाकाबंदी करून शोध मोहीम सुरू केली. काही वेळातच कंडारी गावाजवळील मन्यारखेडा शिवारात चोरीस गेलेले वाहन आणि फोडलेल्या अवस्थेतील एटीएम मशीन पोलिसांना आढळले. मात्र, चोरट्यांनी मशीनमधील सर्व रोकड आधीच काढून घेतली होती. बँकेचे शाखा व्यवस्थापक हरीश गांधी यांनी दिलेल्या माहितीनुसार, दोन एप्रिल रोजी एटीएममध्ये सुमारे १० लाख रुपये भरले होते. त्यात अंदाजे सात लाख रुपये शिल्लक होते. चोरट्यांनी ही संपूर्ण रक्कम लंपास केली आहे.

# महापालिकेतर्फे छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन

प्रतिनिधी । जळगाव

स्वराज्याचे निर्माते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त आज जळगाव शहर महानगरपालिकेच्या वतीने त्यांना अभिवादन करण्यात आले.




कार्यक्रमाची सुरुवात शहरातील मुख्य शिवतीर्थ चौकात झाली. येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याला महापौर दीपमाला काळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी महाराजांच्या प्रतिमेचेही पूजन करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज की जयच्या जयघोषाने हा परिसर दुमदुमून गेला होता. शिवतीर्थावरील अभिवादनानंतर महानगरपालिकेच्या मुख्य इमारतीमध्ये कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या ठिकाणी असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या भव्य प्रतिमेला महापौर दीपमाला काळे यांनी पुष्पहार अर्पण केला.या प्रसंगी महापौर दीपमाला काळे, उपमहापौर मनोज चौधरी, स्थायी समिती सभापती डॉ. चंद्रशेखर पाटील,आयुक्त ज्ञानेश्वर ढेरे, अतिरिक्त आयुक्त शोभा बाविस्कर यांच्यासह महापालिकेचे विविध विभागांचे अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### रायसोनी स्कूलच्या विद्यार्थ्यांचे सामूहिक हनुमान चालीसा पठण

**जळगाव ।** येथील बी.यू.एन. रायसोनी स्कूल, सी.बी.एस.ई. पॅटर्न, प्रेमनगर येथे दि. २ एप्रिल रोजी श्री हनुमान जन्मोत्सवाचे औचित्य साधून शाळेमध्ये उत्साहात श्री हनुमान जयंती साजरी करण्यात आली.कार्यक्रमाची सुरुवात शाळेच्या पालक-शिक्षक संघाच्या सदस्या ललिता टिपरे तसेच शाळेच्या शिक्षकवृंदांच्या हस्ते श्रीहनुमान, सरस्वतीदेवी यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून करण्यात आली. इयत्ता नर्सरी ते इयत्ता ८ वीच्या विद्यार्थ्यांनी प्रेमनगर येथील केशरीनंदन हनुमान मंदिरात जाऊन सामूहिक हनुमान चालीसा पठण केले.

# रुग्णांची सेवा करू हीच स्व. गोदावरी आजींना आदरांजली

## महादेव हॉस्पीलच्या तज्ञांनी घेतली शपथ; स्व. गोदावरी आजींना अभिवादन

प्रतिनिधी । जळगाव

**ज्या मातेच्या प्रेरणेतून भव्य वैद्यकिय सुविधा जळगावला उपलब्ध करून दिल्या जात आहे. त्या गोदावरी आजींच्या सेवा का अभियानाचा आदर्श डोळयासमोर ठेवून रूग्णांची सेवा करण्याची शपथ महादेव हॉस्पीटलच्या तज्ञांनी घेत आदरांजली वाहिली.**



यावेळी स्व. गोदावरी आजींच्या कार्याला उजाळा देतांना अनेक तज्ञांनी त्याचेबाबत अनुभव विषद केला. यावेळी गोदावरी फॉउंडेशनचे उपाध्यक्ष सुभाष पाटील, डॉ. जयेश पाटील, डॉ.कमलेश तायडे, डॉ.भरत बोरोले, डॉ.सुनील पाटील, डॉ.नरेंद्र शिरसाठ, डॉ.प्रतिक कपाटे, सुभाष पाटील, डॉ.अभय जोशी, डॉ. विनोद बाविस्कर, प्रा.एन.जी.चौधरी, प्रा. विजय चौधरी, चिन्मय चौधरी, मोक्षदा वाघ, रोहित जावळे, वंदना पाटील, विनिता रस्तोगी उपस्थित होते.

# कमी भावामुळे शेतकरी बेजार, त्यातच अवकाळी पावसाचा मार!

## हवामानातील अनिश्चितता अन् अवकाळी पावसाचे प्रमाण वाढल्याने केळी पिकांसाठी वाढला धोका

प्रतिनिधी । जळगाव

**जळगाव जिल्ह्याचे शेतकरी सध्या अभूतपूर्व आर्थिक आणि नैसर्गिक संकटात सापडले आहेत. गेल्या काही महिन्यांपासून केळीला मिळणारा अत्यंत कमी बाजारभाव, उत्पादन खर्चातील प्रचंड वाढ आणि आता अवकाळी वादळी पावसाचा तडाखा, या तिहेरी संकटामुळे शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. त्यातून सावरणे त्यांच्यासाठी खूपच कठीण झाले आहे.**



गेल्या आठवडाभरापासून जिल्ह्यात अनेक ठिकाणी अचानक हवामान बदलून जोरदार वारे, विजांच्या कडकडाटासह पाऊस होत आहे. या वादळामुळे रब्बी पिकांसोबत केळीच्या बागांमधील झाडे मोठ्या प्रमाणात उन्मळून पडली आहेत. काही ठिकाणी केळी पाने फाटली आहेत. विशेषतः रावेर, यावल, चोपडा, जळगाव आणि मुक्ताईनगर तालुक्यांमध्ये परिस्थिती गंभीर असून, शेकडो हेक्टरवरील केळीच्या बागांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. वादळी वाऱ्यामुळे केळीची उंच झाडे आडवी होऊन घडांना धक्का बसला आहे. अनेक ठिकाणी घड पूर्णपणे खराब झाले असून, बाजारात विक्रीयोग्य राहिलेली नाहीत. यंदा केळीचे उत्पादन चांगले झाले असले, तरी बाजारात दर कोसळले आहेत. मागील वर्षी प्रति क्विंटल २,००० ते २,५०० रुपये भाव मिळणाऱ्या केळीला यंदा जेमतेम ८०० ते १,२०० रुपये भाव मिळत आहे. त्यामुळे उत्पादन खर्चही निघत नसल्याची शेतकऱ्यांची तक्रार आहे.

वाहतूक खर्च, रोपांसह खतांचे वाढलेले दर, मजुरी आणि सिंचनाचा खर्च यामुळे केळीचा प्रति एकर खर्च मोठ्या प्रमाणात वाढला आहे. अशा परिस्थितीत कमी भाव आणि आता अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीने शेतकरी आर्थिकदृष्ट्या कोलमडले आहेत. अनेक शेतकऱ्यांनी बँका, सहकारी सोसायट्या आणि खासगी सावकारांकडून कर्ज घेऊन केळी लागवड केली होती. संबंधित शेतकऱ्यांसमोर आता पिकाचे नुकसान झाल्याने कर्जफेडीचा प्रश्न अधिकच गंभीर झाला आहे. आम्ही कर्ज काढून केळी लागवड केली, पण आता हातात काहीच उरले नाही, अशी व्यथा एका शेतकऱ्याने व्यक्त केली.

कृषी तज्ज्ञांच्या मते, हवामानातील अनिश्चितता आणि अवकाळी पावसाचे प्रमाण वाढत असल्यामुळे केळीसारख्या पिकांसाठी धोका वाढत आहे. वाऱ्यापासून संरक्षणासाठी आधार यंत्रणा (प्रॉपिंग) आणि योग्य नियोजन आवश्यक असले तरी अचानक आलेल्या वादळामुळे नुकसान टाळणे कठीण झाले आहे.

### शासकीय मदतीची नितांत गरज

जिल्हा प्रशासनाने नुकसानीचे पंचनामे करण्यास सुरुवात केली आहे. कृषी विभागाचे अधिकारी केळीच्या बागांची पाहणी करत असून, नुकसानाचे अहवाल तयार केले जात आहेत. शासनाकडून मदत मिळण्याबाबत आश्वासन देण्यात आले आहे. मात्र, प्रत्यक्ष मदत मिळण्यासाठी वेळ लागण्याची शक्यता आहे. शेतकरी संघटनांनी शासनाकडे तत्काळ आर्थिक मदत, हवामानावर आधारित पीकविमा योजनेंतर्गत जलद भरपाई, कर्जमाफी किंवा पुनर्गठन आणि केळीला हमीभाव जाहीर करण्याच्या मागण्या केल्या आहेत.

शासनाने त्वरित पावले उचलली नाहीत तर आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देखील देण्यात आला आहे. सध्याच्या परिस्थितीत अनेक शेतकरी पुढील हंगामात केळी लागवड करावी की नाही, या द्विधा मनःस्थितीत आहेत. सततचे नुकसान आणि अस्थिर बाजारभाव यामुळे केळी लागवड धोक्यात आली आहे. जिल्ह्यातील केळी उत्पादक नैसर्गिक आपत्ती आणि आर्थिक अडचणींच्या कचाट्यात सापडल्याने तातडीच्या शासकीय मदतीची नितांत गरज असल्याची भावना शेतकऱ्यांमधून होत आहे.

# खेलो इंडिया नॅशनल किक बॉक्सिंग स्पर्धेतील विजेत्यांचा भुसावळ रेल्वेस्थानकावर सत्कार

प्रतिनिधी । भुसावळ

**शहरातील सेल्फ डिफेन्स स्पोर्टस असोसिएशनच्या खेळाडूंनी चेन्नई येथे ३० मार्च रोजी झालेल्या खेलो इंडिया नॅशनल किक बॉक्सिंग स्पर्धेमध्ये घवघवीत यश संपादन करून शहराचे नाव लौकिक केले आहे.**



किक बॉक्सिंग स्पर्धेत आरुषी सावकारे हिने सिल्व्हर मेडल तर ममता कंवर हिने ब्रांझ मेडल पटकावले आहे. चेन्नई येथे नुकत्याच झालेल्या खेलो इंडिया नॅशनल किक बॉक्सिंग स्पर्धेत आरुषी सावकारे हिने सिल्व्हर मेडल तर ममता कंवर हिने ब्रांझ मेडल पटकावले. विजेत्या स्पर्धकांना सुमेध शेजवळ, राकेश सपकाळे यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले. त्यांची मेहनत व स्पर्धकांची जिद्द यामुळे यश मिळाल्याचे बॉक्सिंग प्रशिक्षक बाळा मोरे यांनी सांगितले. याप्रसंगी आम्हाला मिळालेल्या यशाचे पूर्ण श्रेय प्रशिक्षक भिमज्योत शेजवळ, सुमेध शेजवळ व राज सपकाळे यांना असल्याचे सिल्व्हर मेडल विजेत्या आरुषी सावकारे यांनी सांगितले. किक बॉक्सिंग स्पर्धेत विजय संपादन केलेल्या स्पर्धकांचे व प्रशिक्षकाचे भुसावळ रेल्वे स्थानकावर आगमन होताच त्यांचे पेढे भरवून पुष्पहार देऊन ढोल-ताशांच्या गजरात मिरवणूक काढण्यात आली. रेल्वे स्थानकाजवळील छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाला भिमज्योत शेजवळ, आरुषी सावकारे व ममता कंवर यांच्या हस्ते माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. तर आरुषी सावकारे हिने रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांना मानवंदना दिली. यावेळी बॉक्सिंगचे प्रशिक्षक नरेंद्र उर्फ बाळा मोरे, रमेश साळवे, नगरसेविका अर्चना सातदिवे, विलास सातदिवे, शांताराम जाधव, विजय साळवे, सरजू तायडे, संगीता भामरे, पत्रकार सुनील आराक, गणेश सपकाळे, संगीता शेजवळ, दामिनी शेजवळ, संगीता सावकारे, रुपेश गायकवाड, धनराज बाविस्कर, प्रसेनजित खरात, अजय शेळके, राजदीप शेजवळ, राम जोहरे, दीपाली शेजवळ, रेखा शेजवळ आदी उपस्थित होते.

**सेल्फ डिफेन्स स्पोर्ट्स असोसिएशनचे प्रशिक्षक भिमज्योत शेजवळ, सुमेध शेजवळ व राकेश सपकाळे यांच्या मार्गदर्शनाखाली किक बॉक्सिंग ज्युडो कराटे आदी प्रशिक्षण मुला-मुलींना दिले जात आहे. भिमज्योत शेजवळ हे गेल्या ३८ वर्षापासून विनामूल्य मुला-मुलींना किक बॉक्सिंगचे प्रशिक्षण देत आहेत.**

## भुसावळात हनुमान जन्मोत्सव साजरा

प्रतिनिधी । भुसावळ

श्री हनुमान जन्मोत्सवानिमित्त वरणगांव रोडवरील रामयण नगरातील शिवालय, श्री संकट मोचन हनुमान मंदिरात हनुमान जन्मोत्सवानिमित्त सकाळी ६ वाजता अभिषेक व पूजा करण्यात आली. भाविकांनी हनुमान चालीसा तसेच मंत्रोपचार पठण केले. मंदिर परिसरात रांगोळ्या टाकून सुशोभीकरण करण्यात आले होते. दिवसभर मंदिर संस्थानतर्फे भाविकांना प्रसाद वाटप करण्यात आले. तसेच दि ४ रोजी संध्याकाळी ५ वाजेपासून सुंदरकांड पाठ या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यशस्वीतेसाठी प्रमोद सिंग, सुभाश कुळकर्णी, हरिष शर्मा, डॉ सुधिर ओझा, ब्रिजेश कुशवाह, विक्रांत कुशवाह, राहूल तावरे यांनी परिश्रम घेतले.

## थोडक्यात

### भुसावळ येथील कष्टकरी कुटुंबातील तरुणांचा सत्कार

**भुसावळ ।** शहरातील गौतम नगर व पंचशील नगरातील कष्टकरी कुटुंबातील चार तरुणांचा नुकताच प्रेरणादायी सत्कार झाला. सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक अडचणींवर मात करत त्यांनी वकिलीचे शिक्षण पूर्ण केले. कार्यक्रमात ॲड. शुभम चंद्रकांत सपकाळे, ॲड. भूषण दिगंबर गवळी, ॲड. आकाश रमेश सावळे यांचा वकिली पदवी पूर्ण केल्याबद्दल सत्कार करण्यात आला. यावेळी अध्यक्षस्थानी प्रा.डॉ. जयवंत मगर (सिनेट सदस्य उमवि जळगाव, अध्यक्ष मागासवर्गीय प्राध्यापक संघटना) तर प्रमुख वक्ते म्हणून प्रा.डॉ. संजीव सावळे (उपप्राचार्य, जी. जी. खडसे महाविद्यालय मुक्ताईनगर) हे होते. यावेळी प्रा.डॉ.अनिल हिवाळे (सचिव, मागासवर्गीय प्राध्यापक संघटना) यांची उपस्थिती होती.

### न.ह.रांका विद्यालयात वर्धमान महावीर जयंती साजरी

**बोदवड ।** येथील रांका विद्यालयात जैन धर्माचे २४ वे तीर्थंकर वर्धमान महावीर यांच्या जयंतीनिमित्त संस्थेचे सचिव विकास कोटेचा यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम पार पडला. यावेळी संचालक रमेश जैन, विद्यालयाचे मुख्याध्यापक पी.एम. पाटील, उपमुख्याध्यापिका एम.एस. बडगुजर, उपप्राचार्य एम.टी. नेमाडे, ज्येष्ठ पर्यवेक्षक आर. के.तायडे, जे.एन.माळी विद्यालयातील शिक्षक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी, बंधू भगिनी, विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला वर्धमान महावीरांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यात आले. यावेळी प्रास्ताविक प्रा.जे.के.पाटील यांनी तर अनुमोदन प्रा.जी.व्ही. चौधरी यांनी दिले.

## चोपड्यात आज हिंदू संमेलन

प्रतिनिधी । चोपडा



**येथे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त संपूर्ण भारत देशातील वस्तीनुसार हिंदू संमेलनाचे आयोजन सकल हिंदू समाजाच्या वतीने करण्यात आले आहेत.**

चोपडा तालुक्यातील वस्ती आणि लहान मोठ्या गावांत हिंदू संमेलनाचे आयोजन स्थानिक समिती गठीत करून आयोजित करण्यात आले आहे. चोपडा शहरातील गांधी चौक हिंदू संमेलन समितीच्या वतीने शहरातील मुख्य छत्रपती शिवाजी महाराज चौकात हिंदू संमेलन शनिवार दि.४ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आले आहे.

यावेळी प्रमुख वक्ते म्हणून विश्व हिंदू परिषदचे योगेश्वर गर्गे (जळगाव) तसेच ह. भ. प सोपान महाराज कनेरकर (विदर्भ) हे युवा व्याख्याते व कीर्तनकार आशीर्वचन देण्याकरिता उपस्थित राहणार आहे. यावेळी कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे ही आवाहन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## समाजकार्याच्या माध्यमातूनच समाजाचा विकास होवू शकतो : सरपंच वंदना भादले

प्रतिनिधी । चोपडा

**समाजकार्याच्या माध्यमातूनच गावाचा आणि समाजाचा विकास होवू शकतो, असे प्रतिपादन सरपंच वंदना भादले यांनी केले.**



समाजकार्य महाविद्यालयाच्या एम.एस.डब्ल्यू.द्वितीय वर्षाच्या क्षेत्रकार्य निरोप समारंभाचे आयोजन सत्रासेन(ता.चोपडा) येथील आश्रमशाळेत करण्यात आले होते. त्याप्रसंगी सरपंच वंदना भादले यांनी अध्यक्षीय भाषणातून मार्गदर्शन केले. समाजकार्य महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी क्षेत्रकार्यातर्गत केलेल्या कामाचे कौतुक करताना समाजकार्य समाजात जाऊन प्रत्यक्ष कार्य करीत असल्यामुळे आदिवासी दुर्गम भागात विविध योजना, जनजागृती, योजना लाभ देणेकरिता मदत, विविध शिबिरांचे आयोजन असे अनेक कार्यक्रम राबवून समाजास मदत केली. यामुळे समाजात विकास होणेकरिता हातभार लागला. त्यामुळे समाजकार्यच्या माध्यमातून समाजाचा विकास होवू शकतो, असे मत व्यक्त केले. या कार्यक्रमात सुरुवातीला अध्यक्ष वंदना भादले व प्रमुख अतिथी श्री. पवार यांचे स्वागत करण्यात आले. कल्याणी पाटील व तेजस्वी कुवर यांनी क्षेत्र कार्य अंतर्गत वर्षभराच्या कार्यक्रमांचा आढावा घेतला . कार्यक्रमाचे प्रास्ताविक क्षेत्र कार्य पर्यवेक्षक डॉ.विनोद रायपुरे यांनी केले. सूत्रसंचलन निकिता कोकणी यांनी तर आभार स्वेता सोनावणे यांनी मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते. सर्व विद्यार्थ्यांना वर्षभर क्षेत्रकार्य प्रमुख डॉ.विनोद रायपुरे व डॉ.आशीष गुजराथी यांचे मार्गदर्शन लाभले.

## कमला नेहरू मुलींच्या वसतिगृहात ग्लुकोज पावडर वाटप

प्रतिनिधी । चोपडा

**येथील कमला नेहरू मुलीच्या वसतिगृहात खाद्य पदार्थ व जूस वाटपाचा कार्यक्रम तापी सूतगीरणीचे संचालक राजेंद्र भास्करराव पाटील, संताजी प्रतिष्ठान चोपडाचे अध्यक्ष देवकांत चौधरी यांच्या हस्ते वाटप करण्यात आले.**



यावेळी के.डी. चौधरी, रवी पाटील, वसतिगृहाचे संचालक महेश शिरसाठ हे उपस्थित होते. यावेळी प्रमुख अतिथी राजेंद्र पाटील यांनी मुलींना मार्गदर्शन करून दिल्लीच्या माँ कर्मादेवी ट्रस्टचे अभिनंदन करून पुरुषोत्तम राठोड व तान्या राठोड यांचे आभार म्हणाले.

महेंद्र शिरसाठ यांनी स्वागत व आभार मानले. यावेळी कर्मचाऱ्यांसह विद्यार्थिंनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जोगलखेडा येथे अखंड हरिनाम सप्ताह

प्रतिनिधी । पारोळा

तालुक्यातील जोगलखेडा येथील एकवीरा मंदिरात अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. यात दि. ३१ रोजी हभप प.पू. लक्ष्मण शास्त्री महाराज खेडी भोकरीकर यांचे कीर्तन झाले, तर दि. १ रोजी हभप स्वरगंधर्व कोमल महाराज यांचे काल्याचे कीर्तन पार पडले. या कीर्तनांचा लाभ गावातील मोठ्या संख्येने उपस्थित श्रोत्यांनी घेतला.

## राष्ट्र अन् कुटुंबाचा कणा म्हणजे महिला : डॉ. चंद्रकांत बारेला



प्रतिनिधी । चोपडा

महिला म्हणजे राष्ट्र आणि कुटुंबाचा कणा असून त्यांच्या आरोग्यावरच राष्ट्राचे तथा कुटुंबाचे आरोग्य अवलंबून असते म्हणून महिलांनी स्वतःच्या आरोग्याची विशेष काळजी घेण्याची आवश्यकता आहे. आई सुदृढ असेल तरच सुदृढ बाळ जन्माला येईल. त्यामुळे महिलांनी आपल्या आरोग्यासंदर्भात जागृत राहून आहार, विहार, गरजेनुसार आवश्यक व्यायाम आणि लसीकरणाकडे लक्ष द्यावे, असे प्रतिपादन चोपडा नगरपालिका रुग्णालयातील डॉ. चंद्रकांत बारेला यांनी केले. यावेळी त्यांनी उपस्थित महिलांना आरोग्य, आहार, लसीकरण, नियमित आरोग्य तपासणी इत्यादीचे महत्त्व सांगितले.

येथील समाजकार्य महाविद्यालयातील समाजकार्य पारंगत प्रथम वर्षाच्या कुटुंब आणि बालकल्याण विषयांतर्गत क्षेत्रकार्य करणाऱ्या विद्यार्थ्यांनी नगरपालिका रुग्णालय, चोपडा येथे आयोजित केलेल्या महिलांनी आरोग्यविषयक घ्यावयाची काळजी या विषयावर ते बोलत होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यार्थिनी वर्षाराणी गायकवाड यांनी केले.

यावेळी विचार मंचावर समाजकार्य पारंगत प्रथम वर्षाचे क्षेत्रकार्य पर्यवेक्षक प्रा.डॉ. राहुल निकम, प्रा. डॉ. उत्तम सोनकांबळे, जिल्हा रुग्णालय नंदुरबार येथील आरोग्य अधीक्षक सागर पाटील, अजय जैस्वाल, पल्लवी पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी प्रा.डॉ. राहुल निकम यांनी सुदृढ शारीरिक आणि मानसिक आरोग्य हा सुखी जीवनाचा एकमेव पर्याय असल्याचे प्रतिपादन केले. प्रा.डॉ. उत्तम सोनकांबळे यांनी चोपडा शहर नगरपालिका रुग्णालयातून मिळणाऱ्या विविध मोफत सेवा सुविधांकडे उपस्थितांचे लक्ष वेधले. त्यांची आवश्यकता आणि गरज समजावून सांगितली. सूत्रसंचालन वर्षाराणी गायकवाड यांनी केले आणि आभार रायसिंग वसावे यांनी केले. यावेळी अस्मा वसावे, शितल शिंदे, गजानन करंदीकर, मच्छिंद्र बाविस्कर, वर्षा सोनवणे, बिना पावरा यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## उमेशच्या साहसामुळे जिल्ह्याच्या लौकिकात भर : ॲड. संदीप पाटील

प्रतिनिधी । चोपडा

**येथील महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे दादासाहेब डॉ. सुरेश जी.पाटील महाविद्यालयातर्फे गणपूर (ता.चोपडा) येथील उमेश ऊर्फ ओम रवींद्र पाटील याने नदीपात्रात उडी मारून बुडणाऱ्या चार जणांचे प्राण वाचवल्याबद्दल त्याचे अभिनंदन व कौतुक करण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.**



गणपूर येथील रहिवासी व शेतीकाम करणाऱ्या रविंद्र पाटील यांचा मुलगा व विकास माध्यमिक विद्यालयात इयत्ता आठवीच्या वर्गात शिकणारा उमेश उर्फ ओम रविंद्र पाटील याला दि.१५ मार्च २०२६ रोजी सकाळी १० वाजेच्या सुमारास गावातील अनेर नदीपात्रात चार युवक बुडताना आढळून आले. यावेळी ओमने स्वतःची जीवाची पर्वा न करता नदीपात्रात उडी मारून एक एक करत चारही जणांचे प्राण वाचवले. उमेशने केलेल्या या धाडसी व साहसी कर्तृत्वाचे जिल्हाभरातून कौतुक होत आहे.

महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड.संदीप सुरेश पाटील यांनी उमेशने केलेल्या या धाडसी कार्याचे अभिनंदन करताना उमेशच्या पुढील शिक्षणास महात्मा गांधी शिक्षण मंडळ, चोपडा तसेच दादासाहेब डॉ. सुरेश जी. पाटील महाविद्यालय हातभार लावणार असल्याचे सांगितले. यावेळी उमेशचे अभिनंदन करताना ॲड. संदीप पाटील म्हणाले की, उमेशच्या या कार्यामुळे जळगाव जिल्ह्याच्या नावलौकिकात भर पडली आहे. या विद्यार्थ्याचे शौर्य आणि साहस इतरांना निश्चितच प्रेरणादायी ठरणार आहे. यावेळी प्रथम वर्ष कला शाखेतील विद्यार्थिनी चंदना मनोज नेटके हिला विद्यापीठाकडून प्रथम शिक्षित विद्यार्थिनी पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्याबद्दल तसेच निरंजन बारेला या विद्यार्थ्यास राष्ट्रीय रांगोळी स्पर्धेत प्रथम पारितोषिक प्राप्त झाल्याबद्दल त्यांचा सत्कार ॲड. संदीप पाटील व डॉ. स्मिता पाटील यांच्या हस्ते करण्यात आला.

याप्रसंगी पं.स.चे माजी सभापती प्रमोद पाटील, उमेशचे वडील रवींद्र पाटील, प्रा. डॉ. के. एन. सोनवणे, प्रा. डॉ. आर. एम. बागुल, प्रा. डॉ. ए. आदी उपस्थित होते.

## पंकज इंग्लिश स्कूलमध्ये सीनियर केजीच्या विद्यार्थ्यांचा पदवीप्रदान सोहळा उत्साहात

### सीनियर केजीच्या सर्व विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र देऊन सन्मान

प्रतिनिधी । चोपडा

**येथील पंकज शैक्षणिक व सामाजिक संस्था संचलित पंकज इंग्लिश स्कूलमध्ये सीनियर केजीच्या विद्यार्थ्यांचा पदवी प्रदान सोहळा उत्साहपूर्ण व आनंदी वातावरणात पार पडला.**

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासातील महत्त्वाचा टप्पा साजरा करत त्यांना पदवी प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमासाठी संस्थेचे उपाध्यक्ष अविनाश राणे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.




तसेच पंकज प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक एम. व्ही.पाटील, पालक प्रतिनिधी गजानन पाटील, धिरज बच्छाव, वर्षा पाटील आणि केतन माळी यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने झाली. त्यानंतर नीता पाटील यांनी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चा आढावा सादर केला. पुढे सीनियर केजीच्या सर्व विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या आकर्षक नृत्य, गीत आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांनी आपल्या मातांसोबत केलेल्या आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणाला उपस्थितांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित मान्यवरांचे आभार मानण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षिका रंजना तायडे, अनिता पाटील, श्रीमती कविता पारधी, नीता पाटील तसेच इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

**● मुख्याध्यापक एम. व्ही. पाटील यांनी विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी मार्गदर्शन केले.यावेळी केतन माळी यांनी आगामी शैक्षणिक वर्षाची रूपरेषा पालकांना समजावून सांगत १ एप्रिलपासून सुरू होणाऱ्या समर कॅम्पबाबत माहिती दिली.**

## धरणगाव तालुक्यात खरीप पिके काढताना शेतकऱ्यांची दाणादाण

प्रतिनिधी । धरणगाव



धरणगांव हरासह तालुक्यातील आनोरे, धानोरे, गारखेडे, पिंप्री, शिवारात गेल्या दोन दिवसांपासून खरीप पिके काढणीची चांगलीच दाणादाण उडत आहे. तालुक्यात मका, गहू, ज्वारीचा पेरा अधिक प्रमाणात आहे. खरीपचे सर्वच पीके काढणीला आलेले असतांना पावसाने शेतकरी भयभीत झालेला आहे. गेल्या दोन दिवसांपासून वादळ आणि पावसाने थैमान घातले असून अवकाळी चा फटका पिकांना बसू लागला आहे. ज्वारी देखील वादळामुळे जमीनदोस्त झाल्याने अधिकची मजूरी द्यावी लागत आहे. मका आणि गहूला देखील समाधानकारक भाव मिळत नसल्याने शेतकरी हवालदिल झालेला आहे. आणखी दोन दिवस पाऊस आणि वादळाची शक्यता असल्याने शेतकरी जीव मुठीत धरून आहे.